**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २९/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश</u>**

०१. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम १४४ अन्वये गैरअर्जदारकडून रक्कम रु.१०,०००/– प्रत्येकी इतकी अंतरिम पोटगी मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत मिळणेसाठी केला आहे.

०२. अर्जदार हिने मुळ अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ चा आणि गैरअर्जदारचा विवाह हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे दि.०६/०७/२००८ रोजी इंदापूर येथे झाला. विवाहानंतर गैरअर्जदार यांनी तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. त्यामुळे अर्जदार हे दिनांक १३/०९/२०२४ रोजीपासुन तिचे मावशी व काकाकडे राहत आहे. अर्जदार क्र.२ व ३ ही अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांची अपत्ये असून ती अर्जदार क्र.१ सोबत राहतात. गैरअर्जदार हा बागायती शेतीतून तसेच दुधाचा व्यवसाय करुन दरसाल १० ते १२ लाख रुपये उत्पन्न मिळवितो. अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. गैरअर्जदार प्रस्तुत प्रकरणात हजर झाला. मात्र गैरअर्जदारने म्हणणे दाखल केले नाही.

०५. अर्जदारच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्दे माझे विचारार्थ निश्चित होत असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अर्जदार हे प्रस्तुत अर्जानुसार अंतरिम निर्वाहभत्ता मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशतः होय. |
| २. आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र. १ बाबत–**

०६. अर्जदारांची अर्जातील कथने विनाआव्हानित राहीली आहेत. तसेच अर्जदारतर्फे निशाणी ३ लगत दाखल ७/१२ चे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदारच्या नावे मौजे नरुटवाडी येथे शेतजमीनी असून त्यामध्ये बागायती पिके घेतली जातात. सदर ७/१२ उतारे अर्जदारच्या प्रस्तुत अर्जातील गैरअर्जदार याच्या उत्पन्नाबाबतच्या कथनांना प्रथमदर्शनी दुजोरा देतात.

१०. अर्जदाराचे कथनावरून तुर्तास तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही दि.१३/०९/२०२४ पासून तिच्या मावशी व काकाकडे गैरअर्जदारापासून विभक्त राहत असल्याचे प्रथमदर्शणी स्पष्ट होते. अर्जदार ही तिच्या मावशी व काकावर उदरनिर्वाहासाठी अवलंबुन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत

आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे विवाहानंतर पत्नीचा व मुलांचा योग्यप्रकारे सांभाळ करण्याची गैरअर्जदारची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदार ही गैरअर्जदार पासून विभक्त रहात असल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदारांच्या सांभाळाची, उदरनिर्वाहाची तजवीज केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. परिणामी अर्जदार हे मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत निर्वाह भत्ता मिळण्यासाठी पात्र आहेत.

११. अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी गैरअर्जदारची आहे. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांची परिस्थिती, त्यांचे राहणीमान, सध्याची महागाई लक्षात घेता गैरअर्जदाराने अर्जदार क्रमांक १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा २,०००/- रुपये निर्वाह भत्ता देण्याबाबत आदेश करणे योग्य व न्यायसंगत होईल असे मी समजतो. तसेच अर्जदार क्र.२ व ३ हे सज्ञान होईपर्यंत वरीप्रमाणे निर्वाह भत्ता देण्याबाबत आदेश करणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर अंशतः होय असे नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक २ बाबत–**

१२. मुद्दा क्रमांक १ च्या निष्कर्षानुसार अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

<u>आदेश</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

०२. गैरअर्जदाराने अर्जदार क्रमांक १ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा र.रु. २,०००/– (रक्कम रुपये दोन हजार फक्त) इतकी रक्कम अंतरीम

निर्वाह भत्ता म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाच्या अंतिम निर्णयापर्यंत द्यावी.

०३. वरील आदेश कलम २ मधील निर्वाह भत्याचा आदेश अर्जदार क्र.२ व ३ यांच्याकरिता ते सज्ञान होईपर्यंत लागू राहिल.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2025.07.05 12:35:35 +0530

इंदापूर (प्र.चं.बारटक्के)
दिनांकः ०५/०७/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.